# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (राजशिष्टाचार शाखा)

ए विंग पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे 1
फोन नं.020-26120720 मेल puneprotocol@gmail.com

दि.08/05/2026 रोजी प्रसिध्द केलेल्या ई-निविदाच्या ई निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्त दि.14/05/2026 दुपारी 3.00 वा.

खाजगी ठेकेदार यांचेमार्फत राजशिष्टाचार शाखा जिल्हाधिकरी कार्यालय, पुणे यांचे कामकाजासाठी वाहने तीन वर्ष कराराने घेणेसाठी दि.08/05/2026 रोजी www.mahatenders.gov.in या साईटवर ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर विषयाची निविदा पूर्व बैठक आज दि.14/05/2026 रोजी दुपारी 3.00 वा. राजशिष्टाचार शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पार पडली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | उपस्थितांचे नांव | संस्थेतील पद | संस्थेचे नांव | कार्यालयाचा मेल/वैयक्तीक मेल | कार्यालयाचा दूरध्वनी क्र./फॅक्स क्र. | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रा.शि.भोसले | उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | puneprotocol@gmail.com | 26120720 | 965744456 |
| 2 | श्री.संदेश चवडे | मालक | लक्सस मोबॅलिटी इंडिया प्रा.लि. | sandesh@luxusmobility.com | 7219216800 | 7057242344 |
| 3 | श्री. कृष्णा भोसले | मालक | श्रीराज टूर्स | - | 9922753260 | 8010804721 |
| 4 | श्री.धिरज माने | मालक | भारत इंटरनॅशनल ट्रॅव्हल्स म्हैसूर प्रा.लि. | - | 9823389910 | 9823389910 |
| 5 | श्री.प्रमोद सपकाळ | मॅनेजर | ओंकार लॉजिस्टिक्स पुणे | account@omkarlogistics.net | 9325498822 | 9511261983 |
| 6 | श्री. नागेश नामदे | मालक | हाऊस ऑफ ट्रॅव्हल्स अॅण्ड कार रेंटल्स | Nagesh.Namade@hotmail.com | 9138911266 | 7888029385 |
| 7 | श्री.सुरेश कोडीतकर | वाईस चेअरमन | दत्त दिगंबर सह.वाहतूक कामगार संस्था मर्या. कात्रज पुणे 46 | dattadigamber@yahoo.com | 9422083544 | 9422083544 |

6|14|5

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | श्री. किरण दिपक देसाई | भागीदार | श्री. स्वामी समर्थ टूर्स | swamirajtourisum@yahoo.com | 9822856585<br>7741885555 | 9028246720 |
| 9 | श्री.सोमनाथ गायकवाड | मालक | एटीन ट्रॅव्हल्स | info@Eighteentravels.com<br>somnath@Eighteentravels.com | 9881497744 | -- |
| 10 | श्री.प्रदीप राखुंडे | मालक | निलेश टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स | -- | 976760501 | -- |
| 11 | श्री.केदार | मॅनेजर | रोहन टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स | rohantravels95@gmail.com | 9422255455 | -- |

बैठकीस उपस्थित सर्वांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) यांनी सर्व प्रथम निविदेची कार्यपध्दती, अटी व शर्ती वाचून दाखवल्या. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्र.शापसे 3425/प्र.क्र.48/राशि-3 दि.20/04/2026 रोजीचे पत्रानुसार अटी व शर्ती प्राप्त झालेल्या असून त्याच अटी व शर्तीवर ई-निविदा प्रसिध्द करणेत आली असल्याचे सांगणेत आले. सदर विषयी उपस्थितांनी खालीलप्रमाणे लेखी व तोंडी आक्षेप नोंदवले व सूचना केल्या.

| अ.क्र | उपस्थितांचे / संस्थेचे नांव | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| 1 | एटीन ट्रॅव्हल्स | 1. आपलेकडून प्रसिध्द करणेत आलेल्या निविदा प्रक्रियांमध्ये सदर निविदेची किंमत ही र.रु. 5 कोटी नमूद करणेत आलेली आहे. सदरची निविदेची रक्कम कोणत्या तांत्रिक व बाजारमूल्य वाढीच्या किमतीवर काढणेत आलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. यापूर्वी आपले विभागामार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या निविदेमध्ये सदरची रक्कम अंदाजित र.रु.40 लाख असल्याची दिसून येत आहे. त्यामुळे पुढील 2-3 वर्षामध्ये या रकमेमध्ये बदल होऊन सदर रक्कम ही 5 कोटी इतकी मोठी कशी झाली याबाबत साशंकता आहे. कामाच्या स्वरुपात बदल न करता करण्यात आलेली इतकी मोठी निविदा किंमत ही केंद्रीय दक्षता आयोगाच्या Realistis Estimation धोरणाचे उल्लंघन करणारी आहे.<br>2. सदर निविदेमधील तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र.5 अन्वये निविदा धारकाने मागील 3 वर्षाची आर्थिक उलाढाल र.रु. 6 कोटी असल्याचे प्रमाणपत्र जोडणेबाबत नमूद केले आहे. केंद्रीय दक्षता आयोग यांचेकडील परिपत्रक क्र.12-01-1-CTE-6 दि.17/12/2002 मधील नियम 5 (अ)(१) मध्ये मागील ३ वर्षाच्या |
| 2 | स्वामीराज टुरिझम | |
| 3 | भारत इंटरनॅशनल ट्रॅव्हल्स म्हैसूर प्रा.लि. | |
| 4 | लक्सस मोबॅलिटी इंडिया प्रा.लि. | |
| 5 | ओंकार लॉजिस्टिक्स पुणे | |
| 6 | रोहन ट्रॅव्हल्स प्रा.लि. | |
| 7 | हाऊस ऑफ ट्रॅव्हल्स अॅण्ड कार रेंटल्स | |
| 8 | विराज टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स | |
| 9 | दत्त दिगंबर सह.वाहतूक कामगार संस्था मर्या. कात्रज पुणे 46 | |

| | | |
|---|---|---|
| | | उलाढालीबाबत नमूद करण्यात आले असून निविदेची अंदाजित किंमतीच्या 30% रक्कम ही निविदाधारकाची मागील 3 वर्षाची उलाढाल असावी असे नमूद केले आहे. आपणामार्फत देण्यात आलेली र.र. 6 कोटीची उलाढाल ही कोणत्या शासकीय नियमांच्या आधारे देण्यात आली याचा बोध होणे आवश्यक आहे. सदरची अट जाणीवपूर्वक वाढवून नवीन स्पर्धकांना बाहेर ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याचे यावरुन दिसून येत आहे.<br>3. सदर निविदेमधील तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र.6 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखेला वा शासकीय परिवहन सेवा कार्यालयास मागील ३ वर्षामध्ये एकाच वेळी किमान 15 वाहने पुरविल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. यामध्ये शासकीय परिवहन सेवा कार्यालये यांचा बोध झाला नसून जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखेला किमान 15 वर्षे वाहन पुरविल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे असणे हे नियमबाह्य आहे. अशी अट मर्यादिल करणारी असून ती केवळ एका विशिष्ट जुन्या कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्यासाठी टाकण्यात आल्याचे स्पष्ट होते.<br>4. या निविदेमध्ये स्वत:च्या मालकीची वाहने असावीत असा नियम असणे अपेक्षित आहे. परंतु निविदेमध्ये एखाद्या संस्थेला फायदा व्हावा या उद्देशाने 5 सिडान कार व 5 एस.यु.व्ही. वाहने असावीत असा नियम टाकण्यात आला आहे. सदर बाब चुकीची वाटत असून एखाद्या कंपनीकडे सिडान कार पेक्षाही उच्च प्रतीची वाहने असतील तर त्यांची योग्यता असूनही त्यांना यामधून बाहेर पडावे लागणार आहे.<br>5. निविदाधारकाची मागील ३ वर्षाची किमान ६ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल असणे ही अट नमूद करण्यात आलेली आहे. सदर अट ही विद्यमान कामाच्या स्वरुपाच्या तुलनेत अधिक असल्याचे वाटते. यामुळे मध्यम व नवादित परंतु |

8/14/5

| | | |
|---|---|---|
| | | सक्षम कंपन्यांना स्पर्धेमधून बाहेर रहावे लागू शकते. त्यामुळे ही अट वास्तववादी व सर्वसमावेशक पातळीवर ठेवण्यात यावी ही विनंती.<br>6. जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखा किंवा शासकीय परिवहन कार्यालयास एकाच वेळी किमान 15 वाहने पुरविल्याचा अनुभव बंधनकारक करण्यात आलेला आहे. मात्र खाजगी क्षेत्रातील मोठया कॉर्पोरेट संस्था, उद्योग समूह, आयटी कंपन्या किंवा इतर प्रतिष्ठित संस्थांना दिलेला वाहन पुरवठा अनुभव देखील ग्राह्य धरण्यात यावा. कारण सर्व सक्षम संस्थांना शासकीय अनुभव असणे शक्य नसते.<br>7. निविदेमध्ये विशिष्ट प्रकारची वाहने (सिडान/एसयुव्ही) मालकीची असणे आवश्यक नमूद केले आहे. परंतु अनेक संस्थांकडे बसेस किंवा इतर व्यावसायिक प्रवासी वाहने उपलब्ध असतात. निविदा धारकाकडे स्वत:च्या मालकीची पर्यटन परवानाधारक वाहने असणे ही अट पुरेशी ठरु शकते. त्यामुळे वाहनांच्या प्रकाराबाबत अधिक व्यापक व लवचिक निकष ठेवण्यात यावेत.<br>8. इतर जिल्ह्यातील तत्सम राजशिष्टाचार निविदांमध्ये आर्थिक उलाढालीचे निकष तुलनेने कमी ठेवण्यात आलेले दिसून येतात. त्यामुळे सदर निविदेमधील अटींचा पुर्नविचार करुन सर्व पात्र अनुभवी कंपन्यांना समान संधी उपलब्ध करुन द्यावी.<br>9. वाहने अनुभव 10/15 चालू शकेल परंतु व केंद्र शासन/राज्य शासन/PSU पैकी कुठल्याही एका संस्थेस किमान 10/15 वाहने पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र, तरी कृपया PSU हा शब्द टाकून **आणि** शब्द वगळून **किंवा** असा शब्द हवा.(टिप- राजशिष्टाचार 15 वाहने बंधन केल्यास पुण्यातील फक्त विद्यमान पार्टी क्वालिफाय होईल व पारदर्शी स्पर्धेला गालबोट लागेल.<br>10. निविदा फॉर्म फी – रु.5,000/- (पाच हजार) अशी ठेवावी EMD रु.80,000/- (ऐंशी हजार) |

81415

| | | |
|---|---|---|
| | | अशी ठेवावी जेणे करुन जास्तीत जास्त पार्टी सहभाग करतील.<br>11. Standard formula as Estimated Value is Rs. 5,00,00,000/-Then Turn over should be 5,00,00,000 X 30% = 1,50,000,00/- त्यामुळे मागील 3 वर्षाची वार्षिक उलाढाल किमान 1.5 कोटी असावी.<br>12. स्व मालकीची 5 वाहने (TP) किंवा जर मालकीची नसतील तर कोणातर्फे लीज पध्दतीने घेतलेली असतील तरी चालतील.<br>अन्यथा नाशिक सारखी निविदा रद्द करुन पुन: नव्याने निविदा प्रसारण करणेची वेळ येऊ नये म्हणून या सार्वजनिक सूचना मांडत आहोत.<br>13. सुरक्षा ठेव रु.1.20 लक्षच असावी.<br>14. अंतिम मुदतीच्या आत किमान वाजवी बाजारभाव दरपत्रक प्रसिध्द करावे. |

वरीलप्रमाणे निविदादारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर खरेदी समितीची बैठक घेऊन योग्य ते निर्णय घेण्यात येतील व ते निविदे सोबत संकेतस्थळावर सादर करुन सर्वांना कळविणेत येतील असे सांगून, उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

14/5

**(रा.शि.भोसले)**
**उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार), पुणे**

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (राजशिष्टाचार शाखा)

ए विंग पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे 1

फोन नं.020-26120720

मेल puneprotocol@gmail.com


## खरेदी समिती बैठक इतिवृत्त

**खाजगी वाहने भाडेतत्त्वावर घेणेसाठी दि.08/05/2026 रोजी प्रसिध्द केलेल्या ई निविदेवरील ई-निविदा पूर्व बैठकीत प्राप्त आक्षेप/सूचना वर निर्णय घेणेसाठी खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि. 18/05/2026 दुपारी 5.00 वाजता**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.शापसे 3425/प्र.क्र.48/राशि-3 दि.20/04/2026 रोजीचे पत्रानुसार अटी व शर्ती नमूद करुन राजशिष्टाचार शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे कामकाजासाठी खाजगी वाहने भाडेतत्त्वावर घेणेसाठी दि.08/05/2026 रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व चार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यातील वेळापत्रकानुसार दि.14/05/2026 रोजी इच्छुकांची निविदापूर्व बैठक राजशिष्टाचार शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दुपारी 3.00 वा घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात आले असून ते समोर ठेवण्यात आले. या बैठकीस खालीलप्रमाणे खरेदी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ. क्र. | अधिकारी यांचे नांव | पद | कार्यालयाचे नांव | कार्यालयाचा ईमेल / वैयक्तीक ईमेल | कार्यालयाचा दूरध्वनी/फॅक्स क्रमांक | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.जितेंद्र डूडी | जिल्हाधिकारी, पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | collector.pune@maharashtra.gov.in | २६१२४९४९ | ९७८३८०२०२० |
| २ | श्री.रा.शि.भोसले | उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे राजशिष्टाचार शाखा | puneprotocol@gmail.com | २६१२०७२० | ९६५७४४४५१६ |
| ३ | श्री.नंदकिशोर काळे | सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे | प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे | rto.१२-mh@gov.in | -- | ९८२२८४२३३३ |
| ४ | श्री.देवराम शेळके | कोषागार अधिकारी, | जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे | devram.shelke@gmail.com | ०२०-२६१२१२१४/१५ | ९७६२७१३७७४ |

उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. मुद्देनिहाय विचार विनिमय करण्यात आला. दि. 14/05/2026 रोजीच्या निविदा पूर्व बैठकीत उपस्थितांनी उपस्थित केलेले सर्व आक्षेप व सूचनांचा सदर बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात आलेला आहे. तसेच संबंधितांनी दिलेल्या लेखी सूचनांचे या समितीने अवलोकन करुन त्यावर सविस्तर विचार विनिमय केला. त्यानुसार खरेदी समिती खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदवित आहे.

18/5

| उपस्थितांचे / संस्थेचे नांव | उपस्थित केलेले मुद्दे | समितीचा अभिप्राय |
| --- | --- | --- |
| 1. एटीन ट्रॅव्हल्स<br>2. स्वामीराज टुरिझम<br>3. भारत इंटरनॅशनल ट्रॅव्हल्स म्हैसूर प्रा.लि<br>4. लक्सस मोबॅलिटी इंडिया प्रा.लि.<br>5. ओंकार लॉजिस्टिक्स पुणे<br>6. रोहन ट्रॅव्हल्स प्रा.लि.<br>7. हाऊस ऑफ ट्रॅव्हल्स ॲण्ड कार रेंटल्स<br>8. विराज टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स<br>9. दत्त दिगंबर सह.वाहतूक कामगार संस्था मर्या. कात्रज पुणे 46 | 1. आपलेकडून प्रसिध्द करणेत आलेल्या निविदा प्रक्रियांमध्ये सदर निविदेची किंमत ही र.रु. 5 कोटी नमूद करणेत आलेली आहे. सदरची निविदेची रक्कम कोणत्या तांत्रिक व बाजारमूल्य वाढीच्या किमतीवर काढणेत आलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. यापूर्वी आपले विभागामार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या निविदेमध्ये सदरची रक्कम अंदाजित र.रु.40 लाख असल्याची दिसून येत आहे. त्यामुळे पुढील 2-3 वर्षामध्ये या रकमेमध्ये बदल होऊन सदर रक्कम ही 5 कोटी इतकी मोठी कशी झाली याबाबत साशंकता आहे. कामाच्या स्वरुपात बदल न करता करण्यात आलेली इतकी मोठी निविदा किंमत ही केंद्रीय दक्षता आयोगाच्या Realistis Estimation धोरणाचे उल्लंघन करणारी आहे. | शासन निर्णय क्र दि. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि. 01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.2 नुसार शेवटची खरेदी किंमत हा किमतीचा मुख्य आधार गृहीत धरण्यात आलेला आहे. मागील निविदा करारानुसार सन 2023 ते सन 2026 या कालावधीत वाहतूकीच्या एकूण देयकांची रक्कम रु. अंदाजे 3.50 कोटी रु. होते. आगामी सन 2026 ते 2029 या कालावधी करिता प्रतिवर्ष 8% महागाई वाढ व वाहन मागणीची 20% वाढ गृहीत धरुन निविदा मूल्य अंदाजे 5.00 कोटी निश्चीत करण्यात आल्याचे खरेदी समितीने एकमताने मान्य केले. |
| | 2. सदर निविदेमधील तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र.5 अन्वये निविदा धारकाने मागील 3 वर्षाची आर्थिक उलाढाल र.रु. 6 कोटी असल्याचे प्रमाणपत्र जोडणेबाबत नमूद केले आहे. केंद्रीय दक्षता आयोग यांचेकडील परिपत्रक क्र.12-01-1-CTE-6 दि.17/12/2002 मधील नियम 5 (अ)(१) मध्ये मागील ३ वर्षाच्या उलाढालीबाबत नमूद करण्यात आले असून निविदेची अंदाजित किंमतीच्या 30% रक्कम ही निविदाधारकाची मागील 3 वर्षाची उलाढाल असावी असे नमूद केले आहे. आपणामार्फत देण्यात आलेली र.र. 6 कोटीची उलाढाल ही कोणत्या शासकीय नियमांच्या आधारे देण्यात आली याचा बोध होणे आवश्यक आहे. | सर्वसाधारणपणे कोणतीही निविदा प्रसिध्द करतांना प्रचलित खरेदी धोरणानुसार निविदाधारक संस्थेची मागील तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल निविदा मुल्याच्या किमान 30% गृहीत धरली जाते. तथापि सदर निविदेद्वारे राजशिष्टाचार शाखेमार्फत देशातील/राज्यातील अति महत्त्वाच्या उदा. मा.राष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.राज्यपाल, मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश, मा.मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री इ. सारख्या अति महत्त्वाच्या व्यक्तींना वाहनाचा पुरवठा करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे सदर व्यक्तींची सुरक्षा, निर्धारित वेळा, |

| | | |
|---|---|---|
| | सदरची अट जाणीवपूर्वक वाढवून नवीन स्पर्धकांना बाहेर ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याचे यावरुन दिसून येत आहे. | तसेच त्यांचा राजशिष्टाचार योग्य पध्दतीने पूर्ण करणेकामी शासनाने जाणीवपूर्वक मागील ३ वर्षाची वार्षिक उलाढाल रु.6 कोटी आवश्यक असल्याची अट घालून दिलेली आहे. |
| | 3. सदर निविदेमधील तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र.6 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखेला वा शासकीय परिवहन सेवा कार्यालयास मागील ३ वर्षामध्ये एकाच वेळी किमान 15 वाहने पुरविल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. यामध्ये शासकीय परिवहन सेवा कार्यालये यांचा बोध झाला नसून जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखेला किमान 15 वर्षे वाहन पुरविल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे असणे हे नियमबाह्य आहे. अशी अट मर्यादित करणारी असून ती केवळ एका विशिष्ट जुन्या कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्यासाठी टाकण्यात आल्याचे स्पष्ट होते. | सदर बाबत खरेदी समितीने पुरवठादारास मागील 3 वर्षामध्ये शासनाच्या कार्यालयास एकाचवेळी किमान 15 वाहने पुरवल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. तसेच देशातील विविध जिल्हयांमध्ये राजशिष्टाचार शाखेला किमान 15 वाहने पुरविल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याची अट नमूद आहे. सदर अट ही शासनाने वरील मुद्दा क्र.2 मध्ये नमूद केलेल्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी सुयोग्य व उचित सेवा देणेकामी जाणीवपूर्वक निविदा अटीमध्ये समाविष्ठ केली आहे. सदर निविदेचा उद्देश देशातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना वाहनसेवा देणेचा असल्याने त्यामध्ये सुरक्षा, जोखीम व नियोजित वेळ यांचा उत्तम अनुभव व समन्वय असणा-या देशातील कोणत्याही संस्थेची निवड होणे हा उद्देश आहे. त्यामुळे शासनाने निश्चित केलेली सदर अट कायम ठेवण्यास खरेदी समिती मान्यता देत आहे. |
| | 4. या निविदेमध्ये स्वतःच्या मालकीची वाहने असावीत असा नियम असणे अपेक्षित आहे. परंतु निविदेमध्ये एखाद्या संस्थेला फायदा व्हावा या उद्देशाने 5 सिडान कार व 5 एस.यु.व्ही. वाहने असावीत असा नियम टाकण्यात आला आहे. सदर बाब चुकीची वाटत असून एखाद्या कंपनीकडे सिडान कार | निविदा विषयाची आवश्यकता विचारात घेऊन शासनाने निविदादार संस्थेकडे किमान 5 सेदान व 5 एसयुव्ही वाहने मालकीची असणे बंधनकारक केलेले आहे. निविदादारांनी नमूद केलेल्या व निविदेत समाविष्ट नसलेल्या इतर उच्च प्रतीच्या वाहनांची शासनास |

क्र 18/5

| | | |
|---|---|---|
| | पेक्षाही उच्च प्रतीची वाहने असतील तर त्यांची योग्यता असूनही त्यांना यामधून बाहेर पडावे लागणार आहे. | आवश्यकता नसल्याचे खरेदी समितीने स्पष्ट केले. |
| | 5. निविदाधारकाची मागील ३ वर्षाची किमान ६ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल असणे ही अट नमूद करण्यात आलेली आहे. सदर अट ही विद्यमान कामाच्या स्वरुपाच्या तुलनेत अधिक असल्याचे वाटते. यामुळे मध्यम व नवादित परंतु सक्षम कंपन्यांना स्पर्धेमधून बाहेर रहावे लागू शकते. त्यामुळे ही अट वास्तववादी व सर्वसमावेशक पातळीवर ठेवण्यात यावी ही विनंती. | निविदा विषयाचे महत्त्व व आवश्यकता विचारात घेऊन शासनाने सदर बाबत योग्य निर्णय घेतल्याचे खरेदी समितीने एकमताने निश्चित केले. |
| | 6.जिल्हाधिकारी कार्यालय राजशिष्टाचार शाखा किंवा शासकीय परिवहन कार्यालयास एकाच वेळी किमान 15 वाहने पुरविल्याचा अनुभव बंधनकारक करण्यात आलेला आहे. मात्र खाजगी क्षेत्रातील मोठया कॉर्पोरेट संस्था, उद्योग समूह, आयटी कंपन्या किंवा इतर प्रतिष्ठित संस्थांना दिलेला वाहन पुरवठा अनुभव देखील ग्राह्य धरण्यात यावा. कारण सर्व सक्षम संस्थांना शासकीय अनुभव असणे शक्य नसते | निविदा विषयाच्या कामकाजाचे स्वरुप विचारात घेऊन शासनाने जाणीवपूर्वक फक्त शासकीय कार्यालये व राजशिष्टाचार कामकाजाच्या अनुभवास प्राधान्य दिले आहे. |
| | 7. निविदेमध्ये विशिष्ट प्रकारची वाहने (सिडान/एसयुव्ही) मालकीची असणे आवश्यक नमूद केले आहे. परंतु अनेक संस्थांकडे बसेस किंवा इतर व्यावसायिक प्रवासी वाहने उपलब्ध असतात. निविदा धारकाकडे स्वत:च्या मालकीची पर्यटन परवानाधारक वाहने असणे ही अट पुरेशी ठरु शकते. त्यामुळे वाहनांच्या प्रकाराबाबत अधिक व्यापक व लवचिक निकष ठेवण्यात यावेत. | सदर मुद्द्याचा वरील मुद्दा क्र.४ मध्ये खुलासा केलेला आहे. |
| | 8. इतर जिल्ह्यातील तत्सम राजशिष्टाचार निविदांमध्ये आर्थिक | सर्वसमावेशकता व एकसूत्रीपणा येणेकामी व पुणे जिल्ह्यातील |

5/8/5

| | | |
|---|---|---|
| | उलाढालीचे निकष तुलनेने कमी ठेवण्यात आलेले दिसून येतात. त्यामुळे सदर निविदेमधील अटींचा पुर्नविचार करुन सर्व पात्र अनुभवी कंपन्यांना समान संधी उपलब्ध करुन द्यावी. | कामकाजाचा व्याप इतर जिल्ह्याशी तुलनात्मक नसल्याने शासनाने सदर निविदेच्या अटी व शर्ती निश्चित केलेल्या आहेत. त्यामुळे अटींचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता नाही असे खरेदी समिती स्पष्ट करीत आहे. |
| | 9. वाहने अनुभव 10/15 चालू शकेल परंतु व केंद्र शासन/राज्य शासन/PSU पैकी कुठल्याही एका संस्थेस किमान 10/15 वाहने पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र, तरी कृपया PSU हा शब्द टाकून आणि शब्द वगळून किंवा असा शब्द हवा.(टिप- राजशिष्टाचार 15 वाहने बंधन केल्यास पुण्यातील फक्त विद्यमान पार्टी क्वालिफाय होईल व पारदर्शी स्पर्धेला गालबोट लागेल. | सदर मुद्द्याचा वरील मुद्दा क्र.3 मध्ये समितीने खुलासा केलेला आहे. |
| | 10. निविदा फॉर्म फी – रु.5,000/- (पाच हजार) अशी ठेवावी EMD रु.80,000/- (ऐंशी हजार) अशी ठेवावी जेणे करुन जास्तीत जास्त पार्टी सहभाग करतील. | शासनाच्या खरेदी धोरणानुसार निविदा फॉर्म फी व ईएमडी रक्कम उचित व योग्य असल्याचे खरेदी समिती निश्चित करीत आहे. |
| | 11. Standard formula as Estimated Value is Rs. 5,00,00,000/-Then Turn over should be 5,00,00,000 X 30% = 1,50,000,00/- त्यामुळे मागील 3 वर्षाची वार्षिक उलाढाल किमान 1.5 कोटी असावी. | सदर मुद्द्याचा वरील मुद्दा क्र.1 मध्ये समितीने खुलासा केलेला आहे. |
| | 12. स्व मालकीची 5 वाहने (TP) किंवा जर मालकीची नसतील तर कोणातर्फे लीज पध्दतीने घेतलेली असतील तरी चालतील.<br>अन्यथा नाशिक सारखी निविदा रद्द करुन पुन: नव्याने निविदा प्रसारण करणेची वेळ येऊ नये म्हणून या सार्वजनिक सूचना मांडत आहोत. | निविदा विषयाचे महत्त्व व गांभीर्य विचारात घेऊन शासनाने स्वमालकीची वाहने असणे आवश्यक केले असल्याचे खरेदी समितीने स्पष्ट केले. |
| | 13. सुरक्षा ठेव रु.1.20 लक्षच असावी. | सदरची सूचना मान्य करण्यास योग्य |

ह 18/5

| | | |
|---|---|---|
| | | नाही असे समिती स्पष्ट करते. |
| | 14. अंतिम मुदतीच्या आत किमान वाजवी बाजारभाव दरपत्रक प्रसिध्द करावे. | सदर सूचनेनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे यांचे दि.03/10/2024 रोजीच्या बैठकीतील वाहनाचे भाडे दरपत्रक<br>www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदेसोबत उपलब्ध करुन देणेत येत असल्याचे खरेदी समितीने स्पष्ट केले. |

उपरोक्त मुद्दा क्र. १ ते १४ येथे नमूद केल्यानुसार निविदेबाबत पुढील कार्यवाही करण्यास खरेदी समितीने एकमताने मान्यता दिली व त्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

देवराम शेळके
कोषागार अधिकारी
जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय,पुणे
तथा सदस्य खरेदी समिती

नंदकिशोर काळे
सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
तथा सदस्य खरेदी समिती

रा.शि.भोसले
उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार)
तथा सदस्य सचिव खरेदी समिती

**जितेंद्र डूडी** (भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, पुणे**
**तथा**
**अध्यक्ष खरेदी समिती**

**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे (पुणे, पिंपरी-चिंचवड, बारामती)**
**संयुक्त बैठक क्रमांक ७४/२०२४**

**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांच्या दिनांक ०३.१०.२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे संपन्न झालेल्या बैठकीचे**

# इतिवृत्त

| | |
|---|---|
| **मा.डॉ.सुहास दिवसे,** जिल्हाधिकारी, पुणे | अध्यक्ष |
| **मा.श्री.अमोल झेंडे,** पोलीस उप आयुक्त (वाहतूक), पुणे | **सदस्य** |
| **मा.श्रीमती अर्चना गायकवाड,** प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे | **सदस्य सचिव** |
| **मा.श्री.संदेश चव्हाण,** प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड | **सदस्य सचिव** |
| **मा.श्री.राजेंद्र केसकर,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बारामती | **सदस्य सचिव** |

बैठकीच्या सुरुवातीस सदस्य सचिव तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती अर्चना गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून विषयसुचीबाबत प्रास्तावीक केले.

**विषय क्र.१ :** प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांची बैठक दिनांक ११.०३.२०२४ चे इतिवृत्त कायम करणे.

**निर्णय :-** दिनांक ११.०३.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.

**विषय क्र. २ :- प्रवासी वाहतुक करणाऱ्या तीन आसनी ऑटोरिक्षांच्या नविन थांब्यांबाबत.**

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे यांची बैठक दिनांक ११.०३.२०२४ मधील विषय क्रमांक ५ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

> *निर्णय:*
>
> *पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये ऑटोरिक्षांकरिता थांब्यांना मान्यता देण्यासाठी पुणे व पिंपरी चिंचवड येथील प्रादेशिक परिवहन कार्यालये, पोलीस उप आयुक्त (वाहतूक) आणि महानगरपालिका यांनी संयुक्तपणे जुन्या व नविन थांब्यांचे सर्वेक्षण करून संपूर्ण एकत्रित यादीसह प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करावा.*

(अ) लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर सर्वेक्षण झालेले नाही. प्राधिकरणाच्या उपरोक्त निर्णयानुसार सर्व संबंधीत विभागांकडून जुन्या व नविन ऑटोरिक्षा थांब्याचे सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु असून, सदरची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये स्टँडनिहाय माहिती मान्यतेसाठी सादर करण्याचे प्रस्तावीत.

(ब) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील श्री साईकृपा रिक्षा स्टँण्ड लोनावळा, साईबाबा चौक, रेल्वे स्टेशन, लोणावळा (उत्तर) येथे अधिकृत रिक्षा थांबा मिळण्याकरिता त्यांनी पिंपरी चिंचवड कार्यालयाकडे अर्ज सादर केला होता. त्याअनुषंगाने लोणावळा शहर पोलीस विभाग, लोणावळा रेल्वे स्टेशन प्रबंधक व प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड येथील मोटार वाहन निरिक्षक यांनी सर्वेक्षण केले असून, सदर ऑटोरिक्षा स्टँड मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

**निर्णय :**
**(अ) एक महिन्यात परिपूर्ण सर्वेक्षणासह अहवाल आगामी बैठकीत सादर करावा.**
**(ब) वरील अनुक्रमांक (ब) मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार श्री साईकृपा रिक्षा स्टँण्ड लोनावळा, साईबाबा चौक, रेल्वे स्टेशन, लोणावळा (उत्तर) या रिक्षा स्टँडकरिता प्राधिकरणान्ये मान्यता दिली.**

**विषय क्र. ३ :- काळी-पिवळी मिटर टॅक्सी परिमिट मिळणेबाबत प्राप्त अर्ज.**

श्री.अंबादास सुधाकर ढगे यांनी कुल कॅब टॅक्सी चालक मालक चॅरीटेबल ट्रस्ट या संघटनेच्या लेटर हेडवर प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे तसेच परिवहन आयुक्त कार्यालय मुंबई यांचेकडे अर्ज सादर करून त्यांना काळी-पिवळी मिटर टॅक्सी परवाना मिळावा अशी विनंती केली आहे. त्यांचे कुटूंबाचा उदरनिर्वाह व मुलांचे शिक्षण हे टॅक्सी व्यवसायावर असलंबून असून, त्यांचे कुटुंबामध्ये अन्य उत्पन्नाचे साधन नसल्याने काळी-पिवळी मिटर टॅक्सी परवाना मिळावा अशी मागणी करीत आहेत.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे यांच्या कार्यक्षेत्रात ऑटोरिक्षाद्वारे व्यवसाय करण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्राधिकरण कार्यक्षेत्रामध्ये काळी-पिवळी मिटर टॅक्सी परवाना मिळण्याकरिता अर्ज सादर केला आहे. पूर्वी मुंबई-पुणे-मुंबई काळी-पिवळी टॅक्सीकरिता परवाने जारी करण्यात आलेले होते. ते सर्व टॅक्सी परवाने कुलकॅब टॅक्सीमध्ये परावर्तीत करण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे च्या कार्यक्षेत्रात काळी-पिवळी मीटर टॅक्सीकरिता कोणताही परवाना जारी केलेला नाही.

राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक २७.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत मुंबई-पुणे यां आंतरशहरी मार्गावर चालणाऱ्या परवानाधारकांना टॅक्सी मीटर बसवून स्थानिक व्यवसाय करण्यास परवानगी देण्याबाबत निर्णय झालेला आहे. आजमितीस या मार्गावर कुलकॅबद्वारे व्यवसाय करण्यात येत आहे.

**निर्णय : कुल कॅब संवर्गात, आंतरविभागीय वाहतूकीकरिता संबंधीत प्राधिकरणाच्या संमतीने परवाने जारी करावेत.**

**विषय क्र. ४ :- खाजगी ॲटोरिक्षास मंजूरी मिळणे बाबत.**

विविध खाजगी संस्था / कंपन्या तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था त्यांचे संस्थेच्या कर्मचाऱ्यांना /सभासदांना / रुग्णांना / मुलांना / तसेच अन्य खाजगी कामाकरिता खाजगी संवर्गातील ऑटोरिक्षा मिळणेकरिता अर्ज सादर करीत असतात.

खाजगी ऑटोरिक्षा नोंदणीच्या अनुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०२.१२.२०१५ रोजी मार्गदर्शक सुचना जारी केल्या असून, खाजगी संवर्गातील ऑटोरिक्षांचा गैरवापर होऊन, त्यामधून अवैध प्रवासी वाहतूक झाल्यास, शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असते तसेच अशा वाहनास अपघात झाल्यास प्रवाशांना विमा कंपनीकडून कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही. याकरिता अर्जदार हे खाजगी ऑटोरिक्षा कोणत्या कारणासाठी वापरणार आहेत तसेच सदरची गरजू व्यक्ती त्या रिक्षाचा वापर स्वत:साठीच करेल याबाबतची खातरजमा करूनच खाजगी रिक्षा नोंदणीस परवानगी द्यावी. याशिवाय सरसरकट खाजगी ऑटोरिक्षा नोंदणीस परवानगी देण्यात येऊ नये अशा सुचना प्राप्त आहेत.

वैयक्तीक/खाजगी वापरासाठी मंजूर करण्यात येणारी नविन सीएनजी/पेट्रोल इंधनावर चालणारी, आसन क्षमता ३+१ असलेली, काळा-पिवळा, पोस्टल रेड, हिरवा व अबोली रंगाव्यतिरिक्त अन्य रंगाची नविन ऑटोरिक्षा खाजगी संवर्गात नोंदणी करण्याच्या आधीन राहून परवानगी देण्यात येते.

खाजगी ऑटोरिक्षा मागणीकरिता खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त आहेत.

| अ.क्र. | अर्जदार | उद्देश |
|---|---|---|
| १ | रेनीटी फाउंडेशन, धनलक्ष्मी चेंबर दुसरा मजला, सीटीएस नं. ४१५/१, सोमवार पेठ, पुणे ४११०११ | संस्थेच्या कामकाजाकरिता संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी |
| २ | पुणे मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., २५७ बुधवार पेठ श्री शिवाजी रोड पुणे४११००२ | बँकेला कर्ज वसुलीकरिता |
| ३ | महेश सहकारी बँक लि., पुणे. मुख्य शाखा प्लॉट नं. ३७२/७३/७४ , छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे४११०३७ | बँकेला कर्ज वसुलीकरिता |
| ४ | राजर्षि शाहू सहकारी बँक लि, पुणे मुख्य कार्यालय प्रशासकीय भवन, बाजीराव रोड, पुणे-४११००२ | बँकेच्या कामासाठी कर्जाच्या वसूलीकरिता व्हीजीट करणेकरिता |
| ५ | जनकल्याण नेत्रपेढी ३१८, नारायण पेठ, पुणे | नेत्रपेढीकरिता वापरासाठी |
| ६ | अॅग्रो हॉर्टीकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया संस्था | पुणे शहर व परिसरात निसर्गाशी निगडीत सामाजिक तसेच जनजागृतीपर कार्यक्रमास ये-जा करण्यासाठी |
| ७ | किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनी लि, पुणे | विना व्यवसायीक तत्वावर कंपनीच्या वापरासाठी |
| ८ | श्री कुमार पुरुषोत्तम मोहिरे | त्यांचा मुलगा वय ३१ वर्ष हा १०० % मतिमंद असल्याकारणाने त्याला जाण्या येण्यासाठी |
| ९ | श्री संदीप सोपान मगर, ३०२ मगरपटटा सिटी, हडपसर, पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री संतोष काकासाहेब संकपाळ<br>मा.चंद्रकांतदादा पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण , वस्त्रोद्योग संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री पुणे | शारिरीक व्यधीच्या ऑपरेशन मध्ये पायाची उंची कमी झाल्याने त्यांना स्वत:ला जाण्या येण्याकरिता. |
| ११ | मधूकोष आपर्टमेंट,<br>धायरी फाटयाजवळ, सिंहगड रोड, पुणे. | आपर्टमेंट मधील वयस्कर व्यक्ती व महिलांना बस स्टॉप व मार्केट पर्यंत ये-जा करण्यासाठी |
| १२ | संचालिका दिपगृह सोसायटी वेलफेअर सेंटर<br>१३ ताडीवाला रोड, पुणे-४११००१ | सामाजिक संस्था असून वस्तीगृहातील लाभार्थी व कर्मचाऱ्यांना दळणवळनाकरिता तसेच आपात्कालीन वापर, किराणा व जिवनावश्यक वस्तू ने आण करण्यासाठी |

उपरोक्त् अनुक्रमांक १ ते १२ ऑटोरिक्षा खाजगी संवर्गात नोंदणी करण्याच्या मान्यतेसाठी प्रस्तावीत.

**निर्णय :**

१. **अनुक्रमांक १, २, ३, ४, ५, ७ व ८ मध्ये नमुद अर्जदारांना खाजगी संवर्गात ॲटोरिक्षा नोंदणी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.**

२. **अनुक्रमांक ६, १० व १२ बाबत पडताळणी करून सदर प्रकरणांबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याचे ठरले.**

३. **अनुक्रमांक ९ व ११ मध्ये नमुद अर्जदारांना प्राधिकरणाने परवानगी नाकारली.**

**विषय क्र. ५ :- कामायनी प्रशिक्षण व संशोधन सोसायटी पुणे या संस्थेस सी. एस. आर. ॲक्टीव्हिटी अंतर्गत देणगी मिळालेल्या ऑटोरिक्षाची नोंदणी करणेबाबत.**

कामायनी प्रशिक्षण व संशोधन सोसायटी पुणे या संस्थेने त्यांना देणगी स्वरुपात मिळालेल्या ऑटोरिक्षाची खाजगी संवर्गात नोंदणी करुन मिळण्यासाठी या कार्यालयात अर्ज आ. क्र. ३८१८ दिनांक २३.०३.२०२३ नुसार अर्ज सादर केला आहे. सदर संस्था गेली ५९ वर्षे **बोध्दिक अक्षमता** असलेल्या मुलांसाठी विविध प्रकल्पाव्दारे कार्य करीत आहे. संस्थेच्या गोखले नगर, निगडी व तळेगांव दाभाडे येथे शाखा आहेत या संस्थेमध्ये लाभ घेणारे एकुण ४५० हून अधिक विदयार्थी आहेत असे अर्जात नमुद केले आहे.

त्यांना देणगी म्हणून मिळालेल्या रिक्षाचा मुख्य वापर विदयार्थ्यांना वैद्यकीय तसेच इतर मदत तात्काळ मिळावी यासाठी करणार आहेत.

**निर्णय : कामायनी प्रशिक्षण व संशोधन सोसायटी पुणे या संस्थेने त्यांना देणगी स्वरुपात मिळालेल्या ऑटोरिक्षाची खाजगी संवर्गात नोंदणी प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सर्वानूमते सुरक्षा व्यवस्थेसह मंजूरी देण्यात आली.**

**विषय क्र. ६ :- भाडेतत्वावर घेतलेल्या वाहनांच्या देयकांस मंजुरी मिळणेबाबत.**

पुणे जिल्हायातील मान्यवरांच्या परिवहनासाठी आवश्यकतेनुसार शासनमान्य खाजगी पुरवठादारांकडून वाहने भाडेतत्वावर घेण्यात येतात. त्यापोटी होणाऱ्या खर्चाची अदायगी सामान्य प्रशासन विभाग, राजशिष्टाचार उपविभाग, मंत्रालय मुंबई यांचे मार्फत संबधित पुरवठादारास करण्यात येते.

शासकीय कामासाठी अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांची बैठक क्रमांक ७२ दिनांक १२.०१.२०२४ मधील ठरावानुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. सदरचे भाडेदर वाहन प्रकार / आसनक्षमता / कि.मी. / वापराचे तास तसेच या अनुषंगीक बाबी विचारात घेऊन निश्चित केलेले आहेत. निश्चित केलेल्या भाडेदरामध्ये दुचाकी, तीनचाकी, हलकी वाहने, स्पोर्ट युटीलीटी वाहने, प्रवासी बस, मालवाहू वाहने, पाणी टँकर, अर्थमुव्हीग मशिन्स इ. वाहनांचा समावेश आहे.

मा.उपजिल्हाधिकारी, राजशिष्टाचार, पुणे यांनी पत्र जा. क्र. पी सीए/कावि /१३४/२०२३ दिनांक १३.०४.२०२३ नुसार "मसिडीज" वाहन भाडेतत्वावर शासकीय कामासाठी वापरण्यात आले असून, त्या वाहनाचे भाडेदर कळवावेत असे नमुद केले आहे.

प्राधिकरणाने दिनांक १२.०१.२०२४ रोजीच्या ठरावानुसार निश्चित केलेल्या भाडेदरामध्ये "मसिडीज" या प्रकारच्या वाहनाचा समावेश नाही.

**निर्णय : याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. मा.उपजिल्हाधिकारी, राजशिष्टाचार शाखा, पुणे यांनी निविदा प्रक्रीयेद्वारे कमी दर असलेल्या निविदादाराकडून वाहन उपलब्ध करून घ्यावे.**

**विषय क्र. ७ :- पुणे शहरात इथेनॉलवर चालणाऱ्या ऑटोरिक्षा व स्कुटर्सची संख्या वाढवून पुणे शहरास प्रदूषमुक्त करणेबाबत.**

मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण , वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये श्री चंद्रकांत दादा पाटील यांनी मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांना पत्राव्दारे उपरोक्त विषय कळवून प्रत या कार्यालयास दिलेली आहे. सदर पत्रामध्ये पुणे शहरात वाढत्या वाहन संख्येमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, ध्वनी व वायूप्रदुषण या सारख्या समस्या निर्माण होत आहेत. इथेनॉलसारख्या पर्यायी व पर्यावरण पुरक इंधन वापराचे केंद्र सरकारचे धोरण आहे. या धोरणाचा भाग म्हणुन सर्वत्र इथेनॉल निर्मीतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. पुणे शहरात तीन ठिकाणी इथेनॉल पंप भारत सरकारने सुरु केले आहेत. त्यामुळे पुणे शहरात इथेनॉलचा वापर वाढवून पुणे शहरातील प्रदुषण कमी करण्यास मदत होईल. आज रोजी बजाज व टीव्हीस या दोन कंपन्यांनी इथेनॉल वर चालणाऱ्या ऑटो तसेच स्कुटर्स ची निर्मिती केली आहे. इतर इंधनांच्या तुलनेत इथेनॉल केवळ ६० रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध आहे. इथेनॉल हे हरींत इंधन असून, त्याची निर्मिती शेतमालापासून होते. त्याचा फायदा शेतकऱ्यांना देखील होणार आहे. याकरिता इथेनॉलचा

वापर वाढविणे गरजेचे आहे. हळूहळू पर्यायी इंधणाची लोकप्रियता वाढेल आणि प्रदूषण नियंत्रणाचे प्रयत्न यशस्वी होतील.

पुणे शहरात इथेनॉलवर चालणाऱ्या ऑटो व स्कुटर्सना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे शहरात असणा-या तीन इथेनॉल पंपाच्या ठिकाणास प्रसिध्दी देऊन इथेनॉलवर चालणारी वाहने घेण्याचे नागरीकांना आवाहन करण्यात यावे.

**निर्णय : इथेनॉल इंधनाच्या वापराबाबत जनमानसात प्रसिध्दी द्यावी.**

**विषय क्र. ८ :- लोहगाव विमानतळ येथे एक वर्षा पुर्वी कोणतीही पुर्व सूचना न देता बंद केलेले प्रीपेड ऑटो रिक्षा बुथ बाबत.**

लोहगाव विमानतळ येथे एक वर्षा पुर्वी कोणतीही पुर्व सूचना न देता, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेले प्रीपेड ऑटो रिक्षा काऊंटर बंद करण्यात आले आहे. प्रिपेड ऑटोरिक्षा काउंटर बंद करून, ओला, उबेर व प्रिपेड टॅक्सी काउंटर सुरु ठेवले आहे. सदर ठिकाणी या कार्यालयाचे मोटार वाहन निरिक्षक श्री. अविनाश दळवी यांनी प्रत्यक्ष जाऊन, पाहणी करून, अहवाल सादर केला आहे. प्रिपेड ऑटोरिक्षा काउंटर बंद असल्याचे अहवालात नमुद केले आहे. सदरचे काऊंटर त्वरीत सुरु करुन रिक्षा चालकांना व स्थानिक पुणेकरांना न्याय मिळवून देण्याबाबत श्री.हाजी अरफात शेख राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग-कॅबिनेट मंत्री दर्जा-महाराष्ट्र शासन यांनी पत्राद्वारे केली आहे.

**निर्णय : नमुद ठिकाणी परिवहन विभाग व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करावी. त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करावा.**

**विषय क्र. ९ :- शासकीय कामकाजाकरिता अधिग्रहीत करण्यासाठी टाटा येस आणि अशोक लेलँड दोस्त, जीव्हीडब्लू ३००० कि.ग्रॅ.पेक्षा कमी या संवर्गातील वाहनांचे भाडेदर निश्चित करणे.**

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे यांची बैठक क्रमांक ७२ दिनांक १२.०१.२०२४ मध्ये शासकीय कामकाजासाठी अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या खाजगी वाहनांकरिताचे भाडेदर निश्चित करण्यात आलेले आहेत. (प्रत संलग्न). सदर ठरावातील वाहन प्रकाराच्या यादीमध्ये टाटा येस आणि अशोक लेलँड दोस्त, जीव्हीडब्ल ३००० कि.ग्रॅ.पेक्षा कमी या संवर्गातील वाहनांचा समावेश नसून, सदर वाहनांकरिताचे भाडेदर निश्चित करण्या आले नव्हते.

या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाने दिनांक १२.०१.२०२४ रोजी निश्चित केलेले सर्व प्रकारच्या वाहनां भाडेदर, अटी व शर्ती कायम ठेवण्यात येवून, त्यामध्ये समावेश नसलेल्या टाटा येस आणि अशोक लेलँड दोस

जीव्हीडब्लू ३००० कि.ग्रॅ.पेक्षा कमी या संवर्गातील वाहनांचे भाडेदर खालीलप्रमाणे निश्चित करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**निर्णय : प्राधिकरणाने दिनांक १२.०१.२०२४ रोजी निश्चित केलेले सर्व प्रकारच्या वाहनांचे भाडेदर, अटी व शर्ती कायम ठेवण्यात येत आहेत. (सदरचा मुळ निर्णय जसा आहे तसा खालीलप्रमाणे पुन:श्च सादर येत आहे)**

---

**मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ६२(३) मधील तरतुदीअन्वये परिचलन पद्धतीने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्रमांक ७२ दिनांक १२.०१.२०२४ रोजीचा ठराव**

---

**विषय : शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर ठरविण्याबाबत.**

१) शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांचे वापरासंबंधी धोरणाच्या अनुषगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक १७.०५.२०२० रोजी झालेल्या बैठकीत वाहनांचे दर ठरविण्यात आले होते.

२) वाढते इंधनदर, वाहनाची किमत, विमा हप्ता, इंधन व वंगण दर, देखभालीचा खर्च, वाहनाच्या सुट्या भागांच्या किंमती, कर्जफेडीचा हप्ता, चालकाचे वेतन, महागाई निर्देशांक इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सोबतच्या **प्रपत्र-अ** प्रमाणे सुधारीत दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

३) शासकीय कामासाठी वाहने अधिग्रहीत करण्यासाठी सदरचे सुधारित दर लागू करावेत.

**अटी व शर्ती**

१) वाहनाचे इंधन खर्च वाहन मालकाचा राहील.

२) प्रत्येक वाहनासाठी तपशिलवार माहिती असलेले स्वतंत्र लॉगबुक ठेवावे.

३) वाहन ताब्यात घेतल्यापासून ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरला जाईल.

४) पहिल्या २४ तास किंवा त्याच्या भागाकरिता २४ तासाचे भाडे देय राहिल.

५) २४ तासात ३०० कि.मी.पेक्षा जास्त धाव झाल्यास जास्तीच्या धावेसाठी प्रति कि.मी. भाडे देय होईल.

६) ह्या दराव्यतिरिक्त कुठलेही भत्ते/चार्जेस अनुज्ञेय नसतील.

७) हलके संवर्गातील वाहने शक्यतो ५ वर्षापेक्षा जास्त जुनी नसावीत.

८) वाहनाचा देखभाल खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाचीच राहील.

९) वाहन नादुरुस्त, खराब, अपघातग्रस्त झाल्यास लगेचच दुसरे बदली वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाची असेल.

१०) वाहनाचे / चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, चालकाची अनुज्ञप्ती, बिल्ला इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.

११) टोल व पार्किंग चार्जेस लागू असल्यास वाहन वापरणाऱ्या कार्यालयाने भरावयाचे आहे.

१२) देय असलेल्या वस्तु व सेवा कराचा समावेश नमुद केलेल्या दरात नाही.

१३) आयकर विभागाच्या नियमानुसार देय असलेल्या टीडीएस कपात करण्यात येईल.

# प्रपत्र-अ

## शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आसनक्षमता (कमीत कमी) | २४ तासाचे भाडे रु. | भाडे प्रति कि.मी. रु. |
|---|---|---|---|---|
| | **दुचाकी/तीनचाकी (प्रवासी)** | | | |
| १ | मोटार सायकल | १ + १ | ७०० | ८ |
| २ | ऑटोरिक्षा | ३ + १ | १२५० | १६ |
| | **हलके मोटार वाहन (प्रवासी)** | | | |
| ३ | अवातानुकुलीत टॅक्सी-हॅचबॅक (टाटा इंडिका / व्हीस्टा, स्वीफ्ट इ.) | ४ + १ | २८८८ | १२ |
| ४ | टॅक्सी वातानूकुलीत हॅचबॅक (टाटा इंडिका / व्हीस्टा, स्वीफ्ट इ.) | ४ + १ | ३०८८ | १४ |
| ५ | टॅक्सी अवातानूकुलीत सेदान (इंडिगो, स्विफट डिझायर, होंडा अमेझ, ह्युंडाई अ‍ॅक्सेंट इ.) | ४ + १ | ३०८८ | १४ |
| ६ | टॅक्सी वातानूकुलीत सेदान (इंडिगो, स्विफट डिझायर, होंडा अमेझ, ह्युंडाई अ‍ॅक्सेंट इ.) | ४ + १ | ३३०० | १५ |
| ७ | जीप सदृष्य अवातानुकुलीत वाहने (सुमो / टेम्पो ट्रॅक्स, इको इ.) | ६ + १ | ३७०० | १७ |
| | **स्पोर्ट युटिलिटी व्हेईकल्स** | | | |
| ८ | एसयुव्ही अवातानुकुलीत (इनोव्हा, झायलो, तवेरा, इर्टीगा इ.) | ६ + १ | ५१२५ | २० |
| ९ | एसयुव्ही वातानुकुलीत (इनोव्हा, झायलो, तवेरा, इर्टीगा इ.) | ६ + १ | ५८८८ | २२ |
| | **प्रवासी बस (नॉन एसी)** | | | |
| १० | बस | १४ + १ | ६००० | १८ |
| ११ | बस | १७ + १ | ६६०० | २१ |
| १२ | बस | २५ + १ | १०२०० | ३२ |
| १३ | बस | ३५ + १ | १२००० | ३८ |
| १४ | बस | ४५ + १ | १४४०० | ४६ |
| १५ | बस | ५० + १ | १५००० | ४८ |
| | **मालवाहू वाहने** | | | |
| १६ | हलके मालवाहू मोटार वाहन (LMV Goods) | GVW upto 7500 kgs | ४२०० | १४ |
| १७ | मध्यम मालवाहू मोटार वाहन (MGV Goods) | GVW from 7501 kgs to 12000 kgs | ४८०० | १६ |
| १८ | जड मालवाहू मोटार वाहन (HGV Goods) | GVW 12001 kgs and above | ५४०० | १८ |
| | **पाण्याचे टॅंकर** | | | |
| | पाण्याचा टॅंकर | Upto 3000 Ltr | | रु.६०० प्रतीतास |
| | पाण्याचा टॅंकर | Upto 9000 Ltr | | रु.७०० प्रतीतास |
| | पाण्याचा टॅंकर | Upto 12000 Ltr | | रु.११०० प्रतीतास |

| अर्थमुव्हींग मशिन्स | | | |
|---|---|---|---|
| ट्रॅक्टर ट्रेलर | - | ३४०० | ११ |
| जेसीबी | रु.९००/- प्रतीतास | | |
| पोकलँड २१० | रु.२५००/- प्रतीतास | | |

उपरोक्त प्रस्तावात समावेश नसलेल्या टाटा येस आणि अशोक लेलँड दोस्त, जीव्हीडब्लू ३००० कि.ग्रॅ.पेक्षा कमी या संवर्गातील वाहनांचे भाडेदर खालीलप्रमाणे निश्चित करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

## प्रपत्र-अ

### शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वजन क्षमता | २४ तासाचे भाडे रु. | भाडे प्रति कि.मी. रु. |
|---|---|---|---|---|
| मालवाहू वाहने | | | | |
| १ | टाटा येस आणि अशोक लेलँड दोस्त, जीव्हीडब्लू ३००० कि.ग्रॅ.पेक्षा कमी (LMV Goods) | GVW upto 3000 kgs | २५००/- | १०/- |

**विषय क्र. १० :- मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम २ (७) (ब) (॥) अन्वये नव्याने कार्यान्वीत झालेल्या मेट्रो स्टेशन्सवर शेअर-ए-रिक्षा योजनेस मान्यता देण्याबाबत विचार करणे.**

पुणे शहरात सार्वजनिक वाहतूक ही पीएमपीएमएल बसेस व रिक्षांद्वारे होत आहे. त्यासोबत मेट्रो सेवा देखील विविध टप्प्यांमध्ये कार्यान्वीत होत आहे. सद्यस्थितीमध्ये पुणे व पिंपरी चिचवड परिसरात एकुण २९ मेट्रो स्थानके कार्यान्वीत झाली आहेत. त्यापैकी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे यांच्या दिनांक १०.०८.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये १८ मेट्रो स्थानकांवर सर्वेक्षण करून शेअर ए ऑटोरिक्षा योजना सुरु आहे. नव्याने सुरु झालेल्या उर्वरित ११ मेट्रो स्थानकांचे सर्वेक्षण करून शेअर ए ऑटोरिक्षा योजना सुरु करण्याचे प्रस्तावीत आहे.

**(अ) कार्यान्वीत असलेली :** सर्वेक्षण पुर्ण होऊन शेअर ए ऑटोरिक्षा योजना कार्यान्वीत करण्यात आलेली मेट्रो स्थानके :

| | | |
|---|---|---|
| १. वनाज मेट्रो स्टेशन | २. आनंदनगर मेट्रो स्टेशन | ३. आयडीयल कॉलनी मेट्रो स्टेशन |
| ४. नळस्टॉप मेट्रो स्टेशन | ५. गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशन | ६. पीएमसी मेट्रो स्टेशन |
| ७ सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशन | ८. मंगळवार पेठ मेट्रो स्टेशन | ९. पुणे रेल्वे मेट्रो स्टेशन |
| १०. रुबी हॉल क्लीनिक मेट्रो स्टेशन | ११. शिवाजीनगर मेट्रो स्टेशन | १२. बोपोडी मेट्रो स्टेशन |
| १३. दापोडी मेट्रो स्टेशन | १४. फुगेवाडी मेट्रो स्टेशन | १५. कासारवाडी मेट्रो स्टेशन |
| १६. भोसरी नाशिक फाटा मेट्रो स्टेशन | १७. संत तुकारामनगर मेट्रो स्टेशन | १८. पीसीएमसी मेट्रो स्टेशन |
| तसेच पुणे रेल्वे स्टेशन व शिवाजीनगर रेल्वे स्टेशन | | |

**(ब) प्रस्तावीत** : शेअर ए ऑटोरिक्षा योजना सर्वेक्षण व कार्यान्वीत करण्याकरिता प्रस्तावीत असलेली मेट्रो स्थानके :

| | | |
|---|---|---|
| १. बंडगार्डन मेट्रो स्टेशन | २. येरवडा मेट्रो स्टेशन | ३. कल्याणीनगर मेट्रो स्टेशन |
| ४. रामवाडी मेट्रो स्टेशन | ५. छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्टेशन | ६. डेक्कन जिमखाना मेट्रो स्टेशन |
| ७. कसबा पेठ मेट्रो स्टेशन | ८. मंडई मेट्रो स्टेशन | ९. स्वारगेट मेट्रो स्टेशन |
| १०. खडकी मेट्रो स्टेशन | ११. रेंज हिल्स मेट्रो स्टेशन | |

उपरोक्त नव्याने सुरु झालेल्या अ.क्र.१ ते ११ मेट्रो स्थानकांपासून शहरातील महत्वाच्या ठिकाणांपर्यंतचे सर्वेक्षण खालील नमुन्यामध्ये करुन, शेअर ए ऑटोरिक्षा योजना कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावीत आहे.

| अ.क्र. | मेट्रो स्टेशन पासून प्रवास करण्याचे ठिकाण | अंतर कि.मी. | मीटरप्रमाणे एकुण भाडे रु. | खटुआ समितीच्या शिफारशीनुसार शेअर ए रिक्षाच्या एका खेपेकरिता (Single Trip) ३ प्रवाशांसाठी एकुण भाडे रु. | शेअर ए रिक्षा करिता प्रतिप्रवासी भाडे रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |

शेअर ए ऑटोरिक्षाबाबत मा.खटुआ समितीचा अहवाल शासनाने स्विकारलेला असून, त्यांच्या अहवालातील अनुक्रमांक ७.१५ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

> *7.15 Additional fare for share-an-auto rickshaw.*
>
> *7.15.1 Presently, additional fare of one-third of the basic fare is payable for a share-an-auto rickshaw over and above the basic fare. This enhanced fare is shared by the 3 passengers sharing the auto rickshaw. Thus, each passenger is required to pay only about 45% of the basic fare. The driver is also incentivized due to the extra fare he can earn legitimately.*

त्या अनुषंगाने मेट्रो थांब्यांपासून येथून शेअर ए रिक्षा सुरु करण्याकरिता सर्वेक्षण करून त्याबाबतचा अहवाल मंजूरीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१. मोटार वाहन निरिक्षक, प्रापका, पुणे
२. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, पुणे
३. महानगरपालिका प्रतिनिधी (अभियंता) पुणे
४. महामेट्रो चे प्रतिनिधी
५. रिक्षा संघटनांचे प्रतिनिधी
६. ग्राहक संरक्षण प्रतिनिधी

**निर्णय : एक महिन्यात परिपूर्ण सर्वेक्षणासह अहवाल आगामी बैठकीत सादर करावा.**

**विषय क्र. ११ :ऑटोरिक्षांच्या ईलेक्ट्रॉनिक मिटरचे पुन:प्रमाणीकरण (Calibration) तडजोड शुल्काबाबत**

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम १४१ नुसार ऑटोरिक्षा इलेक्ट्रॉनिक मिटर्सच्या कॅलीब्रेशनची वैधता दोन वर्षे समाप्तीनंतर अथवा भाडे सुधारणेनंतर सदर इलेक्ट्रॉनिक मिटर्सचे पुन:प्रमाणीकरण (कॅलीब्रेशन) करणे आवश्यक आहे.

जे ऑटोरिक्षा/टॅक्सी परवानाधारक वैधता समाप्तीनंतर भाडेमीटरचे रिकॅलीब्रेशन, ज्या तारखेला प्रमाणीत करून घेतील अशा ऑटोरिक्षा परवानाधारकांवर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ८६ अन्वये असलेल्या अधिकारांतर्गत दिनांक २०.१२.२०२२ रोजी रु.५०/- प्रतिदिन तसेच कमाल रु.२०००/- इतके विभागीय शुल्क आकारण्याचा निर्णय पारित केला होता. ऑटोरिक्षा संघटनांनी केलेल्या विनंतीनुसार सद्यस्थितीमध्ये भाडेदर सुधारणा झालेली नसल्याने, व ऑटोरिक्षाधारक नियमित इलेक्ट्रॉनिक मिटर्सचे पुन:प्रमाणीकरण (कॅलीब्रेशन) करत असल्यामुळे सदर विभागीय शुल्क कमी करण्याची मागणी केली आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे सुधारित विभागीय कारवाई / शुल्क आकारणी करण्याचे प्रस्तावीत.

| गुन्ह्याचे स्वरुप | परवाना निलंबन कालावधी | निलंबनाऐवजी तडजोड शुल्क (अॅग्रीड सम) |
|---|---|---|
| विहित मुदतीत मिटर कॅलीब्रेशन न करणे | मुदत समाप्तीनंतरच्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी किमान १ दिवस परवाना निलंबन. तसेच कमाल निलंबन कालावधी १० दिवस राहील. | मुदत समाप्तीनंतरच्या प्रत्येक दिवसासाठी किमान तडजोड शुल्क रु.५०/- तथापी कमाल तडजोड शुल्क रु.५००/- पेक्षा अधिक असणार नाही. |

**निर्णय : उपरोक्त तक्त्याप्रमाणे तडजोड शुल्कात केलेली सुधारणा दिनांक ३१.०१.२०२५ पर्यंत लागू राहील. सर्व रिक्षा चालकांनी यापूर्वी आपल्या रिक्षांचे मीटर कॅलीब्रेशन करून घ्यावे.**

**विषय क्र. १२ : आयत्या वेळचा विषय**

राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत.

महिला व बालविकास विभाग यांचेकडून राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या योजनेकरिता शासन निर्णय क्रमांक मवबा२०२४/प्र.क्र.२२/कार्या-२ दिनांक ०८.०७.२०२४ नुसार शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी राज्यातील १० शहरामध्ये विशेष बाब म्हणून ई-रिक्षा चालविण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. पुणे शहराकरिता एकुण १४०० ई-रिक्षा मंजूर झालेल्या आहेत. शहरामध्ये सदर रिक्षा महिला चालविणार आहेत.

सदर महिलांना व्यवसाय करण्याकरिता शहरातील मेट्रो थांब्यांवर व्यवसाय करण्याकरिता उपलब्धतेबबात मा.अध्यक्षांनी चर्चा केली. चर्चेदरम्यान मेट्रो थांब्यांचे सर्वेक्षण करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या.

**निर्णय : तातडीने सर्वेक्षण करून प्राधिकरणाकडे अहवाल सादर करण्याचे सर्वानूमते ठरले.**

सदस्य सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
बारामती

सदस्य सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी,
पिंपरी-चिंचवड

सदस्य सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पु

सदस्य,
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे तथा
पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे

अध्यक्ष
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे तथा
जिल्हाधिकारी, पुणे.